**दस्तावेज क्र. ५२**

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority

क्रमांक : मजनिप्रा/२०१७/विधिविषयक/प्रकरण क्र ५ (२०१८)/७९२

दि. ०२/११/२०१८

गंगापूर – दारणा संकुलातुन एन एम एक्सप्रेस कालव्याला पाणी पुरवठा करतात त्यातुन सिंचना व्यतिरिक्त पाण्याचे आरक्षण करु नये तसेच त्यासाठी पाण्याचे वहन करु नये याविषयी श्री. शंकर ए. नागरे व श्री. सतीश जी. जोशी यांनी ॲड. यशोदीप देशमुख मार्फत याचिका दाखल केली. प्रकरण क्र. ५/२०१८

या सोबत दि. ०२/११/२०१८ चा मजनिप्रा आदेश क्र. १६ जोडला आहे.

सहपत्र: वरील प्रमाणे

स्वाक्षरित
डॉ. सुरेश कुळकर्णी
सचिव

प्रति : माहितीसाठी व आवश्यक कार्यवाही साठी–

१. श्री. शंकर ए. नागरे व श्री. सतीश जी. जोशी, सदस्य मराठवाडा जनता विकास परिषद, नागेश्वर वाडी, औरंगाबाद मार्फत ॲड. यशोदीप देशमुख, २रा माळा, नटवर चेंबर्स, नगीनदास मास्तर रोड, फोर्ट, मुंबई, ४००००१ .................. याचिकाकर्ते

२. प्रधान सचिव, जलसंपत्ती विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२ (लक्षवेध ए. ए. कपोले, अधिक्षक अभियंता व उपसचिव) ................. प्रतिवादी क्र. १

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: (O) +91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in mwrralibrary@yahoo.co.in
website : www.mwrra.org

३. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, पहिला माळा, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद, ४३१००५ ................ प्रतिवादी क्र. २

४. कार्यकारी संचालक, कोंकण सिंचन विकास महामंडळ, दुसरा माळा, कोपरी वसाहत, बारा बंगला एरिया, ठाणे (पू), ४००६०३ ........................प्रतिवादी क्र. ३

५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे क्षेत्र, नवे प्रशासनिक भवन, कन्यानगर, कोपरी, ठाणे, ४००६०३ ...............प्रतिवादी क्र. ४

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, शिवाजी पथ, स्टेशन रोड, जांभळी नाका, ठाणे, (प), ४००६०३ .......................प्रतिवादी क्र. ५

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**

Maharashtra Water Resources Regulatory Authority

आदेश क्रमांक १६/२०१८

गंगापूर – दारणा संकुलातुन एन एम एक्सप्रेस कालव्याला पाणी पुरवठा करतात त्यातुन सिंचनाव्यतिरिक्त पाण्याचे आरक्षण करु नये तसेच त्यासाठी पाण्याचे वहन करु नये याविषयी. श्री. शंकर ए. नागरे व श्री. सतीश जी. जोशी यांनी ॲड. यशोदीप देशमुख मार्फत याचिका दाखल केली. प्रकरण क्र. ५/२०१८

१. श्री. शंकर आनंद नागरे, राहणार प्लॉट. नं १/जी/एन–४, दत्त निवास, सिडको, औरंगाबाद
२. श्री. सतीश व गोविंदराव जोशी, राहणार प्लॉट नं. ९, हंसराज कॉम्प्लेक्स, नागेश्वरवाडी, औरंगाबाद ............................ याचिकाकर्ता

विरुध्द

१. महाराष्ट्र शासन मार्फत प्रधान सचिव, जलसंपत्ती विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२
२. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, पहिला माळा, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद, ४३१००४
३. कार्यकारी संचालक, कोंकण सिंचन विकास महामंडळ, दुसरा माळा, कोपरी वसाहत, बारा बंगला एरिया, ठाणे (पू), ४००६०३ ...................................... प्रतिवादी

## अंतरिम आदेश

**कोरम:—**
**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, अध्यक्षीय सदस्य, (ज.सं. अभियांत्रिकी)**
**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**
**डॉ. एस. टी. सांगळे, सदस्य (इकॉनॉमीक्स)**

**दि. ०२/११/२०१८**

श्री. शंकर ए. नागरे व श्री. सतीश जी जोशी यांनी ॲड. यशोदीप देशमुख मार्फत दि. ०७/०६/२०१८ ला गंगापूर — दारणा संकुलातुन जे एन एम एक्सप्रेस कालव्याला पाणी पुरवठा करतात त्यातुन सिंचना व्यतिरिक्त पाण्याचे आरक्षण करु नये तसेच त्यासाठी पाण्याचे वहन करु नये याविषयी अनुतोष मिळावा म्हणुन याचिका दाखल केली.

**१. दाखल केलेल्या याचिकेत केलेल्या प्रार्थनेचा सारांश खाली दिला आहे.**

अ) महाराष्ट्र शासन व मुख्य अभियंता उत्तर महाराष्ट्र क्षेत्र नाशिक यांना गंगापूर व दारणा संकुलातुन सिंचना व्यतिरिक्त असलेल्या आरक्षणासाठी पाण्याचे वहन ४ धरणाच्या गटामधे, जे नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस च्या कालव्यातुन मराठवाडाच्या वैजापूर व गंगापूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाला करतात, करण्याची परवानगी देऊ नये.

ब) प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने या ४ धरणांतुन आरक्षण देऊ नये कारण ३१७ दशलक्ष घनमीटर पाणी यातुन नांदुर मध्यमेश्वर धरणातुन कालव्याला उपलब्ध करुन दिले जाते.

क) महाराष्ट्र शासन किंवा दुसऱ्या कोणत्याही कार्याधिकाऱ्यांना पाणी सिंचना व्यतिरिक्त इतर कारणासाठी ४ धरणाचे पाणी नांदुर मध्यमेश्वर कालवा प्रकल्पातुन नाशिक शहर, शहापूर किंवा आसपासची गांवे किंवा कोणतेही शहर/क्षेत्र जे औरंगाबाद जिल्हयाच्या गंगापूर व वैजापूर तालुकाच्या बाहेर आहेत; आरक्षित करण्यास मनाई करावी.

ड) शहापूर भागातील ९७ गावांना जे पाणी दिले जाते त्यासाठी असलेल्या आरक्षणाचे पुनर्विलोकन करण्याची गरज आहे, ज्यामुळे त्यांना पाणी पुरवण्यासाठी कोकणातील इतर धरणांचा योग्य तो पर्याय शोधण्याचा प्रयत्न व्हावा.

या प्रकरणात दुसरी सुनवाणी ३१ ऑक्टोबर २०१८ ला घेतली ज्यामधे खाली दिल्याप्रमाणे हजेरी होती.

१) श्री एस. ए. नागरे — याचिकाकर्ते

२) ॲड. वैदेहि देशमुख — याचिकाकर्त्याची ॲडव्होकेट

३) श्री. ए. ए. कपोले — अधिक्षक अभियंता व उपसचिव, प्रतिवादी क्र. १ करिता

४) श्री. वाय. बी. पाटील — कार्यकारी अभियंता, भातसा धरण विभाग, भातसानगर प्रतिवादी क्र.३ करिता

५) श्री. आर. एस. पांडव — उपविभागीय अभियंता, भातसा धरण विभाग, भातसानगर प्रतिवादी क्र.३ करिता

६) श्री. ए. एच. शेख — सेक्शनल अभियंता, एनआयडी, नाशिक, प्रतिवादी क्र. २ करिता

७) ॲड. शकुंतला वाडेकर — प्रतिवादी १ व ३ करिता ॲडव्होकेट

**२. सादर केलेली कागदपत्रे :—**

अ) प्रतिवादी क्र. १ व ३ करिता असलेल्या ॲडव्होकेट नी वकालतनामा व उत्तरादाखल शपथपत्र सादर केले.

ब) प्रतिवादी क्र. २ साठी सेक्शनल अभियंता, एनआयडी, नाशिक यांनी उत्तरादाखल शपथपत्र दाखल केले.

**३. पक्षाकारांनी केलेला युक्तिवाद :–**

३.१) प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे करिता ॲड. शकुंतला वाडेकर म्हणाल्या की महा. जीवन प्राधिकरणाने (ठाणे) (मजीप्रा) ने पाण्याचा स्त्रोत चिन्हित केल्यामुळे हे मु. कार्यकारी अधिकारी जि. प., ठाणे यांचे सोबत एक पक्षकार आहेत; कारण मुळ कागदपत्रे जी प्राधिकरणाला सादर केली आहेत ती मजीप्रा व जि.प. ठाणे यांच्या मालकीची आहेत.

३.२) श्री. ए. ए. कपोले, उपसचिव यांनी प्रतिवादी क्र. १ च्या वतीने सांगितले की १२.६९ दलघमी पाणी भावली धरणाचे, पेयजलासाठी ९७ गावांना द्यावयाचा निर्णय मंत्रीमंडळाच्या उपसमितिने घेतला आहे. म्हणजेच सक्षम प्राधिकाराने घेतला आहे. त्यांनी पुढे सांगितले की या मंजुरीचा शासन निर्णय दि. २३ मार्च २०१८ ला जारी करण्यात आला. पुढे ते म्हणाले की, भावली धरण नांदुरा–मध्यमेश्वरी प्रकल्पाचा ज्यामधे ४ धरणे येतात (चल जल साठवण ३७९.५१ दलघमी) आहे. घरगुती पाणी वापराचे आरक्षण या नांदुरा–मध्यमेश्वरी प्रकल्पातुन ५०.५९ दलघमी म्हणजे १३.३३% आहे. याप्रमाणे जे आरक्षण दिले आहे ते क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेत आहे.

३.३) हे कामकाज चालु असतांना श्री. कपोले यांनी खाली दिलेल्या बाबी मान्य केल्यात.

१) शासन निर्णयातील क्षेत्रीय वाटपावरुन हे कळत नाही की ठरवलेले % चल जल साठवणीकरता लागु करावयाचे की जे वापर रेखांकिंत (डिजाइंड) केले आहे त्याला लागु करावायचे. तथापि, त्यांनी याबाबतीत आवश्यक ते स्पष्टीकरण जारी करण्याचे मान्य केले.

२) जिल्हा परिषद, ठाणे यांनी पाण्याच्या स्त्रोताची पाणी पुरवठा योजनेसाठी निवड केली. परंतु त्या आधी जि. प. ने निवड करण्यासाठी दुसऱ्या स्त्रोतासाठी पर्यायी अभ्यास केला होता की कसे. याबाबतीत त्यांना कल्पना नाही

३) असिंचित पाणी वापरासाठी आरक्षण देण्यासाठी कांही नीतिविषयक मार्गदर्शक तत्वे सध्या अस्तित्वात नाही

४) या विशिष्ट प्रस्तावात पाणी साधारण खोऱ्यातुन मुबलक असलेल्या खोऱ्याकडे वळवण्यात आले आहे.

३.४) श्री वाय बी पाटील, का. अ. भातसा धरण विभाग, भातसानगर यांनी या बाबीला दुजोरा दिला की, या बहुतेक गावांना उर्ध्व वैतरणा व मध्य वैतरणा जलाशयातुन गुरुत्वाकर्षणाने पाणी पुरवठा करणे शक्य आहे. काही गावांना भातसा धरणातुन पाणी गुरुत्वाकर्षणाने देणे शक्य आहे. त्यांनी भर दिला की उल्हास खोऱ्यातुन पर्यायी स्त्रोताची शक्यता तपासता येण्यासाठी मजीप्रा सोबत संयुक्त अभ्यास घेण्याची आवश्यकता आहे.

३.५) श्री. नागरे, याचिककर्ते यांनी जो पर्यंत पर्यायी अभ्यास पुर्ण होत नाही तो पर्यंत स्थगनादेश देण्यात यावा व या याचिकेवर योग्य तो निर्णय घ्यावा.

४. प्राधिकरणाची निरिक्षणे :–

(१) प्राधिकरणाने नोंद घेतली की शहापूर तालुक्यातील ९७ गावांना पेयजल पुरवठा योजनेला सक्षम प्राधिकाराने मान्यता दिली आहे.

(२) तथापि, प्राधिकरणाने त्यांच्या समोर असलेल्या कागदपत्रांवरुन नोंद घेतली आहे की, जि. प. ठाणे यांनी परिणामाचा विचार न करता किंवा पर्यायी अभ्यास न करता, स्त्रोताची निवड करुन ते चिन्हित केले आहे.

(३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि. प. ठाणे यांनी त्यांचा दि. ३०/०५/२०१८ च्या पत्राने ईगतपुरी जिल्हयातील भावली धरण हा एकच पर्याय असल्याचे प्रमाणीत केले आहे. प्राधिकरणाला, याची शहानिशा करावी लागेल की हे प्रमाणीत करण्यापुर्वी कुठला पर्यायी अभ्यास केला होता की कसे?याची शहानिशा करावी लागेल.

(४) शहापूर तालुका हा उल्हास खोऱ्यात आहे ज्याचे वर्गीकरण विपुल खोऱ्यात केले आहे. आयएसडब्ल्युपी प्रमाणे उल्हास खोऱ्यात, प्रति हेक्टरी सिसिए उर्ध्व गोदावरी उपखोऱ्याच्या, ज्यात भावली धरण समाविष्ट आहे, १० पट आढळून आली आहे. या प्रकरणात सर्वसाधारण खोऱ्यातुन विपूल खोऱ्यात पाणी वळवण्याचा प्रस्ताव आहे. त्याचवेळेस, आयएसडब्ल्युपी मधे असलेल्या तरतूदी नुसार, राज्य शासन समांतरपणे बरेच पाणी उल्हास खोऱ्यातुन उर्ध्व गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन करित आहे, ज्यामुळे त्याची कमतरता भरुन काढता येईल, सर्वसाधारण खोऱ्यातुन विपुल खोऱ्यात पाणी वळविण्याचा प्रयत्न हा असाधारण असा आहे.

**५. निर्देश : —**

अ) मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. ठाणे यांना या प्रकरणात प्रतिवादी करावे. याची प्रत याचिकाकर्त्याला द्यावी.

ब) पाण्याचा स्त्रोत पक्का करण्याच्या आधी त्याच्या पर्यायी अभ्यास केला असल्यास प्रतिवादी क्र. १ व ३ च्या शिफारशी सोबत हा अहवाल प्राधिकरणाला सोपवावा; आणि जर असा अभ्यास केला नसेल तर, तसा अभ्यास म.जी.प्रा. व प्रतिवादी क्र. ३ यांनी करावा त्याचा निष्कर्षाची तपासणी करुन, शेऱ्यासहित प्राधिकरणाला सादर करावा.

क) प्रतिवादी क्र. ३ हे शपथपत्रावर तपशिलवार अहवाल देतील ज्यामधे ते सांगतिल की खोऱ्यात विपुल पाणी असतांनाही ते अस्तित्वात असलेल्या, चालू असलेल्या प्रस्तावित आरक्षणातुन या पेयजल पुरवठा योजनेला पाणी देण्यास असमर्थ आहेत.

ड) राज्य शासन असिंचित पाणी आरक्षणा बद्दल मार्गदर्शक नीतितत्वे २ महिन्याच्या आत तयार करिल, ज्यामधे पर्यायी अभ्यासानंतर जलस्त्रोताची निवड, स्त्रोताची अंतिम निवड करणारे प्राधिकारी, आंतर खोऱ्यांमधे बदली, एका खोऱ्यासाठी दिलेले आरक्षण दुसऱ्या खोऱ्यासाठी ठरवणे, पुनर्विलोकन व जेथे अटींचा भंग झाला असेल ते आरक्षण रद्द करणे, सिंचनाच्या संभावनेची हानी झाली असेल तर ते पुर्ववत करण्यासाठी झालेला खर्च, इत्यादि संबंधित मुद्दे असतील.

| | |
|---|---|
| स्वा. | स्वा. |
| डॉ. एस. टी. सांगळे | विनोद जे. तिवारी |
| सदस्य (इकॉनॉमिक्स) | सदस्य, (विधि) |

स्वा.

व्ही. एम. कुळकर्णी

अध्यक्षीय सदस्य (ज. सं. अभियांत्रिकी)

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**
Maharashtra Water Resources Regulatory Authority

आदेश क्रमांक १६/२०१८ चे शुध्दिपत्र

**गंगापूर – दारणा संकुलातुन एन एम एक्सप्रेस कालव्याला पाणी पुरवठा करतात त्यातुन सिंचना व्यतिरिक्त पाण्याचे आरक्षण करु नये तसेच त्यासाठी पाण्याचे वहन करु नये याविषयी श्री. शंकर ए. नागरे व श्री. सतीश जी. जोशी यांनी ॲड. यशोदीप देशमुख मार्फत याचिका दाखल केली. प्रकरण क्र. ५/२०१८**

**कोरम:–**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, अध्यक्षीय सदस्य, (ज.सं. अभियांत्रिकी)**

**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**

**डॉ. एस. टी. सांगळे, सदस्य (इकॉनॉमीक्स)**

**दि. १६/११/२०१८**

परिच्छेद ५ चा उपपरिच्छेद (क), मजनिप्रा आदेश क्र. १६/२०१८ चे निर्देश जे दि. ०२/११/२०१८ ला जारी केले, त्यामध्ये ''पुर्ण झालेल्या, ''चालु असलेले, प्रस्तावित आरक्षणापासुन'' ऐवजी ''चालू असलेल्या व प्रस्तावित प्रकल्पापासून'' हे वाचावे.

स्वा. १६/११/२०१८
**(डॉ. एस. टी. सांगळे)**
**सदस्य (इकॉनॉमिक्स)**

स्वा. १६/११/२०१८
**(विनोद जे. तिवारी)**
**सदस्य, (विधि)**

स्वा. १६/११/२०१८
**(व्ही. एम. कुळकर्णी)**
**अध्यक्षीय सदस्य (ज. सं. अभियांत्रिकी)**

9th Floor & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. 2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in mwrralibrary@yahoo.co.in
website : www.mwrra.org